रोहयो विभाग
महाराष्ट्र शासन

# महात्मा गांधी
# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
# महाराष्ट्र

**माझं शेत,**
**माझं काम**
**(वैयक्तिक लाभाची कामे)**


**आपलं गाव,**
**आपला विकास**
**(सार्वजनिक लाभाची कामे)**







# अनुज्ञेय कामांची संदर्भ पुस्तिका







**प्रत्येक हाताला काम, प्रत्येक कामाला हात...**



# महात्मा गांधी
# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## ❋ प्रस्तावना ❋

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये ५०% कामे ग्रामपंचायतीमार्फत घेणे बंधनकारक आहे. तसेच ग्रामपंचायत योजनेचा केंद्रबिंदू आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील मजुरांची नोंद करणे, त्यांना जॉबकार्ड वितरीत करणे, हजेरी पत्रक ठेवणे, मागणीनुसार मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देणे, कामाचा आराखडा तयार करणे, अनुज्ञेय कामे पूर्ण झाल्यावर गावाच्या मालमत्ता वहीत नोंद करुन घेणे, इत्यादी जबाबदाऱ्या ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आलेल्या आहेत. तसेच योजनेंतर्गत कामाचा केंद्रबिंदू ग्रामपंचायत असल्याने गावाचा विकास हा योजनेचा मूळ हेतू आहे. त्यानुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे हाती घेतली तर संबंधित गावाचा विकास निश्चित स्वरुपात होऊ शकतो. तरी या उद्देशाने **''आपला गाव आपला विकास''** या संकल्पनेस मनरेगाच्या माध्यमातून मूर्त स्वरुप मिळत आहे. तसेच मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे घेता येतात. त्याअनुषंगाने प्रत्येक ग्रामस्थाला **''माझं शेत, माझं काम''** संकल्पनेतून स्वत:चा व कुटुंबाचा विकास साध्य करता येईल."

## योजनेची ठळक वैशिष्ट्ये

१८ वर्षांवरील प्रौढ व्यक्तींना वर्षभर अकुशल रोजगाराची हमी

### मजुरांची नोंदणी व जॉब कार्ड

* रोजगार मिळविण्याकरिता जॉब कार्ड आवश्यक
* जॉब कार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक
* १५ दिवसांत विनामूल्य जॉब कार्ड मिळणार
* प्रत्येक कुटुंबाला एक जॉब कार्ड
* जॉब कार्डची एक प्रत ग्रामपंचायतीमध्ये व एक प्रत कुटुंबाकडे

### कामाची मागणी व अर्ज

* रोजगार आवश्यक असणाऱ्या नोंदणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज करणे आवश्यक
* नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोच पावती देणे आवश्यक
* नमुना क्रमांक ४ ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मिळतील
* रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमुना ४ मध्ये करू शकतो
* मागणी केल्यानंतर मजुराला १५ दिवसांत ग्रामपंचायतीने रोजगार पुरविणे आवश्यक अन्यथा बेरोजगार भत्ता मिळेल
* मजुराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक
* कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ कळवावे
* गावापासून ५ कि.मी. परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल अन्यथा जास्त अंतराकरिता प्रवास खर्चाची तरतूद

### मजुरीचे दर

* स्त्री व पुरुष मजुरांना केंद्रशासनाद्वारे दरवर्षी निर्धारित केलेल्या समान दराने मजुरी
* केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) मजुरीची निश्चिती

### सोयी व सुविधा

* रोजगाराच्या जागी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, लहान मुलांची देखभाल याकरिता मुलभूत सुविधा उपलब्ध
* बँकेद्वारे अथवा पोस्टामार्फत मजुरीचे प्रदान

### कामाची निवड

* ग्रामसभा अथवा ग्रामपंचायतीने कामांची शिफारस करावी तसेच हाती घ्यावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवावा
* योजनेंतर्गत सामूहिक तथा वैयक्तिक लाभाची कामे, कायमस्वरुपी मालमत्ता निर्माण करणे हे योजनेचे वैशिष्ट्य
* सार्वजनिक अथवा वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कामातील कुशल कामे ग्रामपंचायतींमार्फत करावी
* जुनी कामे पूर्ण करूनच नवीन कामे हाती घेणे आवश्यक
* एकूण कामांपैकी किमान ५०% कामे ग्रामपंचायतींमार्फत, उर्वरित कामे इतर यंत्रणांमार्फत
* मजुरांची कामाची मागणी व मागणीनुसार कामे पुरविणे यांची सांगड घालण्यासाठी दरवर्षी लेबर बजेट तयार करणे आवश्यक
* अकुशल-कुशल प्रमाण ग्रामपंचायत स्तरावर व यंत्रणेच्या कामांसाठी तालुका स्तरावर ६०:४० राखणे
* कंत्राटदार नेमण्यास व यंत्र वापरण्यावर बंदी

### ग्राम रोजगार सेवक

* योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामसेवक यांना मदत करण्यासाठी ग्रामपंचायतीद्वारे ग्राम रोजगार सेवकांची नियुक्ती

* कागदपत्रे सांभाळणे व दैनंदिन उपस्थितीची नोंद घेणे ही ग्राम रोजगार सेवकांची जबाबदारी
* ग्राम रोजगार सेवकांचे मानधन ग्रामपंचायती-मार्फत बँक खात्यावर जमा होणार

## पारदर्शकता

* झालेल्या सर्व कामांचा तपशील व खर्च यांची माहिती ग्रामसभेला देण्यात येणार
* कामाच्या ठिकाणी कामाचे फलक लावणे आवश्यक
* मजुरांचा हजेरीपट सर्वांना माहितीसाठी उपलब्ध असणार
* झालेल्या कामांचे सामाजिक अंकेक्षण
* ग्राम पंचायत भित्ती फलक लावणे आवश्यक

## नवीन उपक्रम

* पंधरवड्यात ग्राम रोजगार दिनाचे आयोजन
* माहिती व तक्रार निवारणासाठी हेल्पलाईन सुरू (१८००१६६८००१)
* ५३०३० क्रमांक वर सशुल्क एसएमएस (SMS)
* तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman) चे सक्षमीकरण
* राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक (State Quality Monitor) ची नियुक्ती
* ग्राम रोजगार दिवसाचे आयोजन

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

* राज्यभरात ई-मस्टर लागू
* इलेक्ट्रॉनिक निधी व्यवस्थापन प्रणालीचा (EFMS) अवलंब
* मजुरांना मजुरी प्रदानाची वेतन चिट्ठी (Pay Slip) वाटप

## महात्मा गांधी नरेगा अंतर्गत अनुज्ञेय वैयक्तिक लाभार्थी

अ) अनुसूचित जाती

आ) अनुसूचित जमाती

इ) भटक्या जमाती (Nomadic Tribes)

ई) भटक्या विमुक्त जमाती (Denotified Tribes)

उ) दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे

ऊ) महिलाप्रधान कुटुंबे

ए) शारीरिक अपंगत्वप्रधान असलेली कुटुंबे

ऐ) भू-सुधार योजनेचे लाभार्थी

ओ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी

औ) अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन्य निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम-२००६ नुसार पात्र व्यक्ती

अं) कृषि कर्ज माफी योजना सन २००८ नुसार अल्प भूधारक [१ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर) पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक/कुळ)] व सिमांत शेतकरी [१ हेक्टर पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक/कुळ)]

केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सुचनांनुसार एका ग्रामपंचायत हद्दीतील उपरोक्त प्रवर्ग (अ) ते (औ) मधील लाभार्थ्यांना सर्वप्रथम लाभ देण्यात यावा व त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रवर्ग (अ) ते (औ) मधील लाभार्थी संपल्यानंतर अल्पभूधारक व सिमांत शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

## वैयक्तिक लाभाची कामे

* भूविकासामार्फत तसेच खोदविहिरी, शेत तळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारुन परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे.
* फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपवाटिका व प्रक्षेत्र वनीकरण यांमार्फत उपजीविकेची साधने वाढवणे.
* परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबांच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखालील आणण्याकरिता त्या जमिनींचा विकास करणे.
* इंदिरा आवास योजनअंतर्गत किंवा राज्य वा केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक.
* पशुधनाला चालना देण्याकरिता कुक्कुटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे.
* मत्स्यव्यवसायाला चालना देण्याकरिता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.
* व्यक्तिगत घरगुती शौचालये.
* विहित मानकांनुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यासारखी ग्रामीण स्वच्छतेसंबंधातील कामे.

## सार्वजनिक लाभाची कामे

* पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यांसारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जल संधारणाची व जल संचयाची बांधकामे.
* व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजली घालणे, समतल बांध, दगडी संरोधन, दगडमातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यासारखी जलव्यवस्थापनविषयक कामे.
* सूक्ष्म व लघु पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे.
* सिंचन तलाव व इतर जलाशये यामधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नूतनीकरण करणे.
* परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनीवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टॅंक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्ष लागवड आणि फलोत्पादन.
* सामुहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.
* जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारुन आणि कृषी उत्पादनांसाठी पक्क्या स्वरुपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारुन कृषी उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे.
* स्वयं-सहाय्यता गटांच्या उपजीविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष.
* 'हगणदारीमुक्त' गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून शाळेतील प्रसाधन गृहे, अंगणवाडी-प्रसाधनगृहे यासारखी ग्रामीण स्वच्छतेसंबंधातील कामे.

* रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणे आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्याच्या जाळ्याशी जोडणे आणि गावांमधील पार्श्व नाली व मोऱ्या यासह अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे.

* खेळाची मैदाने उभारणे.

* ग्राम व गट स्तरावर पूर नियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिध्दता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनःस्थापन करणे, सखल भागात जलनिःस्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पूराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडुजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे.

* ग्राम व गट स्तरावर ग्राम पंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रे, गाव बाजार व स्मशानभूमी इत्यादीकरिता इमारती बांधणे.

* राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे.


* अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे.

* अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परीरक्षण करणे.

* राज्य शासन या संदर्भात अधिसूचित करील अशी इतर कोणतीही कामे.

* केंद्र सरकार राज्य शासनाची विचारविनिमय करुन अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.

# माझं शेत, माझं काम
# वैयक्तिक लाभाची कामे



वैयक्तिक लाभाच्या कामाच्या अंदाज पत्रकाबाबत शासनाने
वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय
www.mahaegs.gov.in या संकेतस्थळावर पहावे.

## सिंचन विहीरी

मनरेगा योजनेतंर्गत अनुज्ञेय प्रवर्गातील लाभार्थ्यांना सिंचन सुविधेसाठी वैयक्तिक सिंचन विहीरी घेता येतात.

विहिरींचे काम घेण्यासाठी किमान ०.६० हेक्टर क्षेत्र सलग असावे.

विद्युत पुरवठा ५ पोलच्या आत उपलब्ध असावा.

सिंचन विहिरीच्या किंमतीची कमाल मर्यादा - रु. ३ लक्ष.





# शेततळे

शेततळ्याचे काम हाती घेण्यापूर्वी चाचणी खड्डा घेणे आवश्यक आहे.

शेततळ्याच्या आकारमानात, जमिनीचा उतार व स्थानिक परिस्थितीनुसार किरकोळ बदल करता येतात.

भूस्तराच्या वर्गवारीनुसार शेततळ्याची कामे घेता येतात.

शेततळ्याचे आकारमानः

१०x१०x३, १५x१०x३, १५x१५x३, २०x१५x३, २०x२०x३, २५x२०x३, ३०x२५x३, २५x२५x३, ३०x३०x३ मीटर



## नॅडेप कंपोस्टींग खत निर्मितीसाठी टाके

नॅडेप कंपोस्टींगद्वारे कृषि उत्पादन वाढीकरीता उत्तम सेंद्रिय खत तयार करता येते.

नॅडेप कंपोस्ट खत तयार करण्यासाठी ३.६ मी. लांबीचे, १.५ मी. रुंदी आणि ०.९ मी. उंचीची टाकी तयार करतात.

खर्चाची मर्यादा: रु. ८,६६६/- प्रति टाकी.

## गांडूळ खत निर्मितीसाठी टाके

गांडूळ खत तयार करण्याकरिता ३.६ मी × १ मी × ०.७५ मीटर आकाराचे टाक्याचे बांधकाम तयार करावे लागते.

जेथे गांडुळ जगविण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध आहे तेथे हे काम घ्यावे.

एका टाक्याची किमत अंदाजे रु. ९,०००/- अशी आहे.



## द्रवरुप जैविक खतः संजिवक किंवा अमृत पाणी

हे खत गुरांचे शेण, मुत्र, गुळ, पीठ यांचे विहीत प्रमाणात मिश्रणातून तयार केले जाते. यात झाडांचे पोषण करण्याची फारच चांगली क्षमता असते.

खत तयार करण्याकरिता साधारणतः १×१×१ मी. आकाराची टाकी बांधावी लागते.

या टाकीतून १००० लिटर द्रव्यरुप खत ५ ते ७ दिवसांत तयार होते.

बांधकामाकरिता खर्चाचा मापदंड रु. २,०००/- प्रति टाके आहे.



## पशुधन/गुरांसाठी पुरक पशुखाद्य-अझोला

अझोला हे सहज वापरता येणार पुरक पशुखाद्य आहे.

अझोला तयार करण्याकरिता २.० मी. x २.० मी. x ०.२ मी. चर खोदून तळास प्लास्टिक पोती पसरावी

एक अझोला चर तयार करण्याचे मुल्य साधारणः रु. २,०००/- असे आहे.

## कुक्कुट पालन शेड (निवारा)

कुक्कुट पालन शेड तयार करण्याकरिता ७.५० चौ. मी. निवारा १०० पक्षांना पुरेसा असतो.

याची लांबी ३.७५ मी. आणि रुंदी २.०० मी. असावी.

कुक्कट पक्षी घराचे बांधकामाचे मुल्य अंदाजे रु. ४८,०००/- अनुज्ञेय आहे.

## शेळी पालन शेड (निवारा)

शेळ्या व मेंढ्यांना उत्तम प्रतीचे गोठे बांधून दिले तर जनावरांचे आरोग्य राहील तसेच त्यांचे मलमूत्र एकत्र गोळा करुन शेतीमध्ये चांगल्या प्रकारचे सेंद्रीय खत म्हणून उपयोगात आणता येईल.

१० शेळ्यांकरिता ७.५० चौ. मी. निवारा पुरेसा असतो.

त्याची लांबी ३.७५ मी. आणि रुंदी २.०० मी. असावी.

चारीही भितींची सरासरी उंची २.२० मी. असावी. भिंती १:४ प्रमाण असलेल्या सिमेंट व वीटांच्या असाव्यात.

बांधकामाचे मापदंड रु. ५१,८५६/- अनुज्ञेय आहे.

## गाय-म्हैस यांच्या करीता गोठा

जनावरांपासून मिळणारे मौल्यवान मुत्र व शेण एक उत्कृष्ट प्रकारचे सेंद्रीय खत असल्याने हे खत शेत जमीनीची सुपिकता व उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी याचा उपयोग करता येतो.

६ गुरांकरीता २६.९५ चौ. मी. जमीन पुरेशी असते.

गोठयाची लांबी ७.७ मी. आणि रुंदी ३.५ मी. असावी.

जनावरांचे मुत्र संचय करण्याकरिता २५० लीटर क्षमतेचे मुत्र संचय टाके असावे.

बांधकामाचे मापदंड रु. ४२,०९५/- छतविरहीत करीता व रु. ७०,०२६/- छतासह आहे.



# शेत बांध बंदिस्ती

मातीची धूप थांबविण्यास आणि शेताच्या मातीतील पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढविण्याच्या  हेतूने शेत बांध बंदिस्तीचा उपचार घेण्यात येतो.

आकारमान: ०.६ मी. उंच, १.७ मी. रुंद, क्षेत्र - ०.५७ चौ. मी., खर्चाची मर्यादा - रु. १०,००० ते रु. १४,००० प्रति हेक्टर जमिनीच्या प्रकारानुसार.





## फळबाग लागवड

फळबाग लागवड शेत जमीनीवर व शेताच्या बांधावर सुध्दा करता येते.

दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायत वृक्ष पिकांचे बाबतीत कमीतकमी ९०% आणि कोरडवाहू वृक्ष पिकांचे बाबतीत ७५% झाडे जीवंत असल्यासच दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

फळपीकांचे प्रकारानुसार कमाल अनुज्ञेय अनुदान रु. २,२५,०००/- पर्यंत देय आहे. फळपीके - आंबा, संत्रा, मोसंबी इत्यादी.

महात्मा गांधी राग्रारोहयोच्या कामे करीत असताना ग्राम पंचायत यंत्रणा असल्यास ग्राम पंचायत स्तरावर तसेच यंत्रणा लाईन डिपार्टमेंट असल्यास तालुका स्तरावर ६०:४० प्रमाणे अकुशल: कुशल खर्चाचे प्रमाण ठेवणे आवश्यक आहे. इच्छुक लाभार्थ्यांच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. तसेच अर्ज करताना ७/१२ व ८ अ चे उतारे अर्जासोबत जोडावेत.



# आपलं गाव, आपला विकास
# सार्वजनिक लाभाची कामे



सार्वजनिक लाभाच्या कामाच्या अंदाज पत्रकाबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय **www.mahaegs.gov.in** या संकेतस्थळावर पहावे.

## जलसंधारण व जलसंवर्धन कामे

| | |
|---|---|
| समपातळी चर | शेत बांध बंदिस्ती |
| समपातळी बांध | पाणीसाठ्यातील गाळ काढणे |
| मातीनाला बांध | ढाळीचे बांध |
| कंपार्टमेंट बंडींग | गॅबियन बंधारे |
| दगडी बांध | |





## वनीकरण व वृक्षलागवड

१. वैश्विक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ग्रामीण भागांना हरित करणे तसेच ग्रामीण भागातील लोकांची लाकूडफाटा, इंधन, फळांची, औषधी वनस्पती व गुरांच्या चाऱ्याची गरज भागविण्यासाठी व ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोपवाटिका तयार करणे व वृक्ष लागवड करणे ही अत्यंत प्रभावी उपायोजना आहे. ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषद, पंचायत व ग्राम पंचायत यांनी महाराष्ट्र हरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याचा कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

२. सदर वनीकरण हे गावाच्या ग्रामपंचायत, गायरान, गावठाण, शासकीय, निमशासकीय, सामुहिक तसेच शैक्षणिक संस्थांच्या जमीनीवर करावे. खाजगी जमीनीवर करण्यात येऊ नये. प्रामुख्याने ग्रामपंचायतीच्या ताब्यात अथवा नियंत्रणाखालील जमीनीवर करावे. वनीकरणाद्वारे तयार होणाऱ्या मालमत्तेवर ग्रामपंचायतीचा अधिकार राहील तसेच त्याची नोंद महात्मा गांधी राग्रारोहयोच्या कामाच्या मालमत्ता नोंदवहीत घेण्यात यावी.

३. रोपवाटिका प्रामुख्याने गावातच ज्या ठिकाणी पाण्याची व वाहतुकीची सोय उपलब्ध आहे अशा जागेत करावी. रोपवाटिका तयार करण्यास जागा उपलब्ध नसेल तर ग्रामपंचायतने रोपे सामाजिक वनिकरणाच्या रोपवाटिकेतून ज्या रोपवाटिकेच्या रोपांचे (किसान रोपवाटिका) दर शासनाने मंजूर केलेले आहेत अशा रोपवाटिकेतून खरेदी करावेत.

४. ग्रामपंचयात दोन प्रकारे वनीकरणाचा कार्यक्रम राबवू शकते.

* ग्रामपंचायत, गायरान, गावठाण, शासकीय, निमशासकीय, सामुहिक व शैक्षणिक संस्थांच्या जमिनीवर गट लागवड करु शकते.

* ग्रामपंचायतच्या हद्दीतील तुटक/विखुरलेली जमीन आणि रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करु शकते.

## गाळ काढणे

नरेगातंर्गत खालील पाणीसाठ्यांमधून गाळ काढता येतो.

सर्व तलाव (लघु पाटबंधारे, पाझर तलाव, पारंपारिक तलाव)

सर्व बंधारे

सर्व विहिरी (रोजगार हमी योजनंअतर्गत घेतलेल्या विहिरी, पारंपारिक विहिरी, कृषि व पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व खाजगी विहिरी यानध्ये पिण्याच्या पाण्याच्या विहिरींना प्राधान्य द्यावे)

सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीद्वारे ही कामे करण्यात येतात. तथापि अपवादात्मक परिस्थितीत पंचायत समितीद्वारे अथवा इतर यंत्रणेद्वारेही ही कामे घेता येतात.

जानेवारी ते जून (पावसाळ्यापूर्वी) या काळात ही कामे विशेषत्वाने घेण्यात यावीत.

तीन वर्षे जुन्या तलावातील गाळ काढण्यास परवानगी राहील.

एकाच हंगामामध्ये पावसाळा सुरू होण्यापूर्वी गाळ काढण्यात येतो.

# राजीव गांधी सेवा केंद्र

* केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार तालुका स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर राजीव गांधी सेवा केंद्र (BNRGSK) बांधता येते.

* राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे जसे जॉब कार्ड, हजेरी पत्रक ठेवणे इत्यादीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. कंत्राटदारामार्फत कामे व यंत्र वापरण्यास बंदी आहे.

* भवनाचे बांधकाम ग्रामपंचायत/पंचायत समिती स्तरावर करावयाचे असल्याने आवश्यकता असल्यास पंचायत समिती, स्वतः कार्यान्वयीन यंत्रणा होऊ (Implementing Agency) शकते.

* पंचायत समितीच्या तालुका भवनासाठी बांधकाम करताना जॉबकार्ड धारक मजूर लगतच्या ५ किलो मिटर परिसरातील ग्रामपंचायतीच्या हद्दीतून उपलब्ध करावेत.

* भवनाची इमारत सुंदर व आकर्षक असावी. भवनाचा आराखडा, संकल्पचित्र व बांधकामाचा तपशिल हा केंद्र शासनाने नामवंत तज्ञांकडून करुन घेतला आहे. तेव्हा त्याचा वापर करावा.



# प्रत्येक हाताला काम,
# प्रत्येक कामाला हात...



* वर्षभर रोजगाराची हमी * पायाभूत सुविधांचा विकास * स्वावलंबी व स्वयंपूर्ण गाव

**योजनेच्या अधिक माहितीकरिता संपर्क करा**

* संकेतस्थळ: www.nrega.nic.in; www.mahaegs.gov.in

* निशुल्क माहिती: १८००२६७६००१

* सशुल्क एसएमएस: ५३०३०